## परिपत्रक 298 दिनांक 26/2/2002

## विषय:- दौरा कार्यक्रम.

धर्मादाय संघटनेतील बऱ्याच कार्यालयातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने, सध्या कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडे एक किंवा दोन जिल्हयांचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. असे निदर्शनास आले आहे की, ज्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे ते अधिकारी दौऱ्यांच्या दिवशी उशीरा म्हणजेच दुपारनंतर कार्यालयात पोहोचतात व दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी कार्यालय सोडतात. त्यामुळे दौरा कालावधीतील एक-दोन दिवसात न्यायिक चौकशीची कामे होत नाहीत. अशाप्रकारे कामे न झाल्याने जनतेच्या तक्रारी होतात.

तरी यापुढे ज्या अधिकाऱ्यांकडे इतर जिल्हयाचा कार्यभार सोपविलेला आहे, त्या अधिकाऱ्याने त्या जिल्हयातील प्रलंबित प्रकरणांची माहिती घेऊन दौरा कार्यक्रम आयोजित करावा. ज्या जिल्हयाचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. त्याठिकाणी महिन्याच्या सुरुवातीस म्हणजे 1 ते 10 तारखे दरम्यान दौरा लावावा व याप्रमाणे एक महिना आगाऊ दौरा कार्यक्रम आखून तो मुख्यालयास सादर करावा.

धर्मादाय आयुक्त (प्र.),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

धर्मादाय सह आयुक्त,
पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती.

धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

सहायक धर्मादाय आयुक्त,
ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/धुळे/सांगली/सातारा/परभणी/नांदेड/उस्मानाबाद/बीड/जालना/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा.